**नि.फौ.ख.क्र.१५/२०२२**
**शासन वि. अक्रमशहा + ०१**
**नि.क्र.१७**

**<u>अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, जिल्हा - बुलढाणा यांचे न्यायालयात</u>**
(पिठासीन अधिकारी : एस. एस. महाले)

# <u>दोषारोप</u>

मी एस. एस. महाले, अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी, मलकापुर, तालुका मलकापुर, जिल्हा बुलढाणा तुमच्यावर

१) अक्रमशहा उर्फ आसीफ शहा रफिकशहा,
वय – २५ वर्षे, व्यवसाय-ऑटो चालक,
राहणार- पांढरी प्लॉट, पारपेठ मलकापुर,
तालुका- मलकापुर, जिल्हा बुलढाणा.

२) जनार्धन सोनाजी इंगळे,
वय –४९ वर्षे, व्यवसाय- मजुरी,
राहणार- बहापुरा, तालुका- मलकापुर,
जिल्हा बुलढाणा.

खालीलप्रमाणे दोषारोप ठेवतो -

तुम्ही दि.०२.१२.२०२१ रोजी दुपारी ०२.०० ते ०२.१५ वाजताचे दरम्यान या न्यायालयाचे स्थळसीमेत, मौजे शिवाजी नगर रेल्वे पुल, भालेगाव रोड, तालुका मलकापुर येथे तुम्ही आरोपींनी तुमच्या समान उद्देशाचे पुनसरणार्थ संरक्षीत प्राणी एक गाय, एक गोरे यांची कत्तलीच्या उद्देशाने वाहतूक केली व त्यामुळे तुमचेवर महाराष्ट्र पशु संवर्धन अधिनियम, १९७६ चे कलम ५ (अ)(ब) दंडनियम कलम ९ अन्वये गुन्हा केल्याबाबत तुमचेवर दोषारोप ठेवण्यात येत आहे.

दुसरे त्याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही आरोपींनी तुमच्या

समान उद्देशाने संरक्षीत एक गाय, एक गोरे यांची ॲपे नोंदणी क्र.एम.एच.२८-ए.बी.४९९९ मध्ये दाटीवाटीने कोंबून त्यांचे चारा-पाण्याची व्यवस्था न करता त्यांना निर्दयतेने वागविले, व त्याद्वारे तुम्ही आरोपींनी प्राण्यांना निर्दयतेने वागविण्याचा प्रतिबंध अधिनियम,१९६० चे कलम ११ अन्वये गुन्हा केल्याबाबत तुमचेवर दोषारोप ठेवण्यात येत आहे.

तिसरे याच दिवशी, वेळी व ठिकाणी तुम्ही सर्व आरोपींनी तुमच्या समान उद्देशाने तुमच्याकडे नमूद जनावरे सदरील ॲपेद्वारे नेण्याचा कुठलाही परवाना नसताना त्यांची वाहतूक केली व त्याद्वारे तुम्ही मोटार वाहन कायद्याच्या कलम ६६/१९२ अन्वये गुन्हा केला आहे.

आणि मी याद्वारे तुमच्याविरुध्द वरील गुन्हयाकरीता खटला चालवण्याचे निर्देश देतो.

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.09.22 16:26:56 +0530

**स्थळ : मलकापुर,**
**दिनांक : २२-०९-२०२५**

**(एस. एस. महाले)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर**

**<u>प्रमाणपत्र</u>**

प्रमाणित करण्यात येते की, आरोपींना उपरोक्त दोषारोप मराठी भाषेत वाचून व समजावून सांगीतला.

Digitally signed by SUNIL SAKHARAM MAHALE
Date: 2025.09.22 16:27:00 +0530

**स्थळ : मलकापुर,**
**दिनांक : २२-०९-२०२५**

**(एस. एस. महाले)**
**अतिरिक्त मुख्य न्यायदंडाधिकारी,**
**मलकापुर**